# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O Office, Palghar**

Phone No. 02525-297032, Mob No.8669604078
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : propalghar@gmail.com


**प्रेसनोट क्र.३९९ दिनांक १९/०४/२०२०**

## वापरलेले N ९५ मास्क पाण्याने धुवुन पुन्हा विक्री करण्यासंदर्भात विरार पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हयातील आरोपीत यांचेकडुन तपासादरम्यान ७१, ८६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात स्थानिक गुन्हे शाखा, वसई युनिट यांना यश

दि.१३/०४/२०२० रोजी १५.४५ वा चे सुमारास विरार पोलीस ठाणे हद्दीतील गंगाराम दत्तु अळकुटे यांचे घरात,गडगापाडा बस स्टॉपजवळ,विरा पुर्व,ता.वसई जि.पालघर येथे आरोपीत १) नागराज रामाराव पिल्ला वय ३३ वर्षे रा. विरार पुर्व ता.वसई जिल्हा पालघर २) रोहित महाविर कोठारी वय ३० वर्षे रा. बोरीवली पुर्व मुंबई मुळ रा. बील नगर,ता.मासुदा, बरेल, अजरेर राजस्थान ३) मोहंमद नौशाद निगार अलम शेख वय २८ वर्षे रा. भिवंडी दांडेकर वाडी ता.भिवंडी. जिल्हा ठाणे यांनी त्यांचे कृतीमुळे घातक रोग पसरु शकतो हे माहित असून देखील व सध्यस्थितीत कोरोना (व्हायरस) साथीचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात असूनही कोणतीही काळजी घेतली नाही. त्यांनी महाराष्ट्र शासन या अधिसुचनेचा अवमान करुन त्यांनी वापवरलेले N९५ मास्क पाण्याने धुवुन विक्री केल्यास कोरोनाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे हे माहीत असूनही त्यांचा साठा करुन ते मास्क वॉशींग मशिनमध्ये धुवून त्यास इस्त्री करुन ते त्याची पॅकींग करुन ते नवीन असल्याचे भासवून विक्री करण्याकरीता साठवणु केलेली असताना मिळून आले. आरोपीत यांचे ताब्यातुन ५१,३४,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. आरोपीत यांचे विरुध्द विरार पोलीस ठाणे गु.र.नं. II ४४१/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४२०, २६९, २७० सह अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३ (८), सह साथीचे रोग प्रतिबंधक कायदा कलम २,३,४ प्रमाणे तसेच कोरोना कोव्हीड १९ चे कायदा २०२० चे कलम ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याच्या तपासात अटक आरोपीत यांचेकडुन वर नमुद जप्त मालाव्यतिरीक्त आणखी मास्क आज दिनांक १६/०४/२०२० रोजी जप्त करण्यात आले असुन त्याचे वर्णन खालीलप्रमाणे,

१) ३,५०,०००/- एकुण किंमतीचे सफेद रंगाचे Jackson कंपनीचे N ९५ प्रतीचे तोंडाला लावण्यात येणारे मास्क ते वापरुन धुवून ठेवलेले एकुण १७५० २) १०,०००/- एकुण किंमतीचे सफेद रंगाचे Honeywell कंपनीचे N ९५ प्रतीचे तोडाला लावण्यात येणारे मास्क ते वापरुन धुवून ठेवलेले एकुण ५० नग ३) ८,००,०००/- एकुण किंमतीचे सफेद रंगाचे Kwality कंपनीचे N ९५ प्रतीचे तोडाला लावण्यात येणारे मास्क ते वापरुन धुवून ठेवलेले एकुण ४,००० नग ४) ६०,२६,०००/- एकुण किंमतीचे सफेद रंगाचे Jackson, Vuns, Kwality, Honeywell, Jackson या कंपनीचे N ९५ प्रतीचे तोडाला लावण्यात येणारे वापरण्यात आलेले जुने मास्क एकुण ३०,१३० नग असा एकुण ७१,८६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा करित आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र नाईक, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती. सिध्दवा जायभाये, सहा. पोलीस निरीक्षक श्री. सुहास कांबळे, सपोनि/संतोष गुजर यांनी व स्थानिक गुन्हे शाखा, वसई युनिट पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned by CamScanner



Scanned by CamScanner